महाराष्ट्र शासन

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगावं जि.जळगांव

यांचे कार्यालय कृषि उत्पन्न बाजार समिती, आवार,धरणगांव. दुरध्वनी क्रमांक वेब-मेल :- ar.dharangaon@coop.maharashtra.gov

जा.क्र. आस्थापना/कलम ७८/ बाभुळगांव विका/प्र.नि./ सन.२०१७ दिनांक. ०८/०६/२०१७

६१०

वाचले :-१) सचिव, बाभुळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बाभुळगांव,ता.धरणगांव यांचा दि.८/६/२०१७ चा अहवाल

२) महाराष्ट्र सहकारी संस्थां अधिनियम १९६० चे कलम ७८ (१)

ज्या अर्थी, बाभुळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बाभुळगांव.ता.धरणगांव जि.जळगांव हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोदणीकृत सहकारी संस्था असून सदर संस्था या कार्यालयाच्या नियंत्रण कक्षेत येते आणि,

ज्या अर्थी बाभुळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बाभुळगांव,ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेचे एकुण १३ संचालका पैकी १२ संचालक निवडून आलेले होते.एक जागा रिक्त आहे. १३ संचालकापैकी १२ संचालक दि.३१/०३/२०१७ रोजी थकबाकीदार झाल्याचा अहवाल संस्थेचे सचिव यांनी वाचले क्र.१ नुसार या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार प्राथमिक कृषि पतसंस्थेच्या बाबतीत पिक कर्जाची नियत दिनांकास परतफेड करण्यात कसुर करणारा सदस्य कोणत्याही सहकारी संस्थेचा सदस्य म्हणुन नेमणुक होण्यास,निवडून येण्यास,स्विकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणुन राहण्यास पात्र असणार नाही.अशी तरतुद आहे.

ज्याअर्थी संस्था सचिव यांनी दि.८/६/२०१७ रोजी लेखी कळवुन सादर केले की,वेळोवेळी खालील नमुद संचालकांनी कर्ज भरणा केलेला नाही.आणि थकबाकीदार सदस्यांची नावे पुढील प्रमाणे १) श्री.सुभाष वाऊराव पाटील व्हा.चेअरमन २) श्री.बंडू धुडकु अहिरे संचालक ३) श्री.नवल सिताराम पाटील संचालक ४) श्री.बाबु दोंधू भोई संचालक ५)श्री.आनंदा भोजू पाटील संचालक ६) श्री.अभिमन रामदास कोळी संचालक ७) श्री.शेनफडू शामराव बागुल संचालक ८)श्री.अंबर राजधर भालेराव ९) सौ.आरस्तोल अरविंद पाटील संचालीका १०) सौ.नर्मदाबाई लालचंद पाटील संचालिका ११) सौ.लताबाई गजानन पाटील संचालिका १२) सौ.छबाबाई उखर्डू कोळी संचालीका

ज्या अर्थी संस्थेच्या १३ संचालकापैकी वर नमुद १२ संचालक थकबाकीदार असल्याने अपात्र झाल्याने संचालक मंडळ अल्पमतात आलेले आहे.

त्या अर्थी संस्थेचे कामकाज उपविधी मधील तरतदीनुसार सुरळीत रहाणेच्या दृष्टीने प्राधिकृत अधिकारी ( प्रशासकाची ) नियुक्ती करणे वरील परिस्थितीच्या अनुषंगाने क्रमप्राप्त झाल्याने मी खालील आदेश देत आहे

## -:आ दे श :-

मी गुलाब पाटील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था धरणगांव ता.धरणगांव जि.जळगांव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन वरील नमुद केलेल्या वस्तुथितीच्या आधारावर,परीस्थीतीमुळे व कारणास्तव बाभुळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.बाभुळगांव,ता.धरणगांव जि.जळगांव या संस्थेची व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत आहे. संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालविण्यासाठी श्री कैलास शेषराव बिजारणे क्षेत्रीय अधिकारी जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव (भाग नं.१ धरणगांव भाग) यांची संस्थेचे प्रशासक म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्रशासक यांनी पदभार घेतल्यापासुन सहा महिन्याचे कालावधीत नविन समितीची रचना करणे बाबत कायदेशीर कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दि. ८/६/२०१७ रोजी माझे स्वाक्षरीने व कार्यालयीन मोहर ठसवुन निर्गमित केला असे.

स्थळ:- धरणगांव

दिनांक:-८/६/२०१७

( गुलाब पाटील )

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था,धरणगांव

प्रति,

१) चेअरमन/सचिव, बाभुळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बाभुळगांव,ता.धरणगांव जि.जळगांव

२) श्री कैलास शेषराव बिजारणे क्षेत्रीय अधिकारी जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव ( भाग नं.१ धरणगांव भाग )

२/- सदर संस्थेच्या प्रशासक पदाचा पदभार घेवुन तसा अहवाल सर्व संबंधीतांना तात्काळ सादर करावा.

प्रत:- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) शाखा व्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा. सोनवद बु

२) मा. व्यवस्थापक येरवडा कारागृह मुद्रणालय पुणे ६

२/- आपणासं विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची प्रत शासनाच्या येत्या राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या चार प्रति या कार्यालयास पाठवाव्यात.

३) लेखा परिक्षक सहकारी संस्था एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव

४) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव माहितीसाठी सविनय सादर

५)म.कार्यकारी संचालक,दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था,धरणगांव